पुढारी



कृषी शिक्षणासंबंधी सामंजस्य करार करताना मान्यवर.

# कृषी विद्यापीठ-मुकुल माधव फाउंडेशनमध्ये सामंजस्य करार

## फाउंडेशनतर्फे 'कृषी'च्या ५९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**पुणे : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणास उत्तेजन देणे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना आर्थिक सहाय्य करणे यासंदर्भात मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्यात नुकताच याबाबतचा सामंजस्य करार झाला. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, संचालक डॉ. ए. एल. फरांदे, पुण्यातील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कंपनी सेक्रेटरी देवांग त्रिवेदी यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत संलग्न महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या एकूण ५९ गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार असून, त्यामध्ये पदवीसाठी ३६, पदव्युत्तर पदवीसाठी २०, तर पीएच.डी. करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना दरवर्षी ही शिष्यवृत्ती मिळणार आहे. स्व. श्रीमती मोहिनी प्रल्हाद छाब्रिया शिष्यवृत्ती प्रतिवर्षी रु. ५०,०००/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे प्रदान करण्यात येणार आहे. ही शिष्यवृत्ती गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून देण्यात येणार आहे.

शिष्यवृत्तीच्या उपक्रमाबरोबरच फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाउंडेशन हे कृषी विद्यापीठाच्या 'रूरल ॲग्रिकल्चर वर्क एक्स्पिरियन्स' (रावे) अर्थात ग्रामीण कृषी कार्यानुभव अभियानात सहभागी होणार आहेत. 'रावे' अंतर्गत विद्यार्थी ग्रामीण भागात राहून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीबद्दल मार्गदर्शन करणार आहेत.